| MHND190013782023 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | १६.०९.२०२३ |
| | नोंदणी दिनांक | : | १६.०९.२०२३ |
| | निकाल दिनांक | : | १३.०८.२०२६ |
| | कालावधी | : | ०२ व. १० म.२८ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड**
**यांच्या न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी श्री. निरंजन बा. चव्हाण)

**फौ.कि.अ.क्र. २९/२०२३** **नि.क्र.१४**

१. **सौ. कावेरी भ्र. यशवंत काळे,**
वयः ३३ वर्षे, व्य.: घरकाम

२. **युवराज पि. यशवंत काळे**
वयः १३ वर्षे, व्य.निरंक

३. **कातिर्क पि. यशवंत काळे**
वयः ९ वर्षे, व्य. निरंक
अर्जदार न. २ व ३ ची अ. पा. क. आई
सौ. कावेरी भ्र. यशवंत काळे,
सर्व रा. वडगांव (किवळा)
ह.मु.कांजाळा ता. लोहा जि.नांदेड

**...अर्जदार**

**विरुध्द–**

१. **यशवंत पि. गणपतराव काळे**
वयः ३५ वर्षे, व्य.:मजुरी
रा.वडगांव (किवळा) ता. लोहा जिल्हा लातुर

**....गैरअर्जदार**

**अर्ज :–** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५(१) अन्वये निर्वाह भत्ता मंजूर होणे करीता.

.................................................................................................

| | | |
|---|---|---|
| अर्जदारांतर्फे वकील | : | ॲड. बी.एम.गोरे |
| गैरअर्जदारातर्फे वकील | : | ॲड. व्ही.एम.चव्हाण |

.................................................................................................

## न्या य नि र्ण य

(घोषित दिनांक १३ ऑगस्ट, २०२६)

प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ (१) अन्वये गैरअर्जदाराच्या विरोधात, निर्वाह भत्ता मंजूर होणे करीता, दाखल करण्यात आला आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात कथन**

**०२.** अर्जदार क्र.१ हीचे लग्न गैरअर्जदार याच्यासोबत सन २०१० मध्ये झाले. सदर लग्नापासून त्यांना अर्जदार क्र. २ युवराज व अर्जदार क्र.३ कार्तिक असे दोन अपत्य झाले.

**०३.** अर्जदार हिच्या सासरकडील मंडळींनी अर्जदार हिला त्रास दिल्यामुळे तिने दिनांक २७.०२.२०२३ रोजी महिला सहाय्यक कक्ष, नांदेड यांच्याकडे तक्रार दिली होती. तसेच अर्जदार हिने तिच्या सासरच्या लोकांनविरुध्द दिनांक २८.०३.२०२३ रोजी ४९८–अ भारतीय दंड विधान, १८६० (भा.द.वि.) प्रमाणे तक्रार दिली होती त्यावरुन त्यांच्या विरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. अर्जदार क्र.२ हा अपंग असल्यामुळे अर्जदार हिने मोल मजुरी करुन त्याचा औषधोपचार व उदरनिर्वाह केला. गैरअर्जदार यांनी अर्जदारांची कुठल्याही प्रकारची पालनपोषणाची व्यवस्था केली नाही.

**०४.** गैर अर्जदार यांच्या कुटूंबात ०४ एकर शेती आहे. तसेच त्याच्याकडे चार चाकी पिकअप बोलोरो वाहन आहे. तसेच गैर अर्जदार हा कुशल मिस्त्री कारागीर आहे. त्यापासुन त्याला दररोज ७००/– (अक्षरी सातशे रुपये केवळ) मिळतात. त्यानुसार त्याला महिण्याकाठी २१,०००/– (अक्षरी एकवीस हजार केवळ) मिळतात. तसेच शेतीच्या उत्पन्नातून ८०,०००/– (अक्षरी ऐंशी हजार केवळ) वर्षाकाठी मिळतात. तसेच पिकअप बोलोरो पासून वर्षाकाठी ३,६०,०००/– (अक्षरी तीन लक्ष साठ हजार रुपये केवळ) मिळतात. गैरअर्जदार हा अर्जदार क्र.०१ हिला ५,०००/–

(अक्षरी पाच हजार रुपये केवळ) व अर्जदार क्र.०२ व ०३ यांना ६,०००/– (अक्षरी सहा हजार रुपये केवळ) सहज देऊ शकतो. त्यामुळे एकुण १७,०००/– (अक्षरी सतरा हजार रुपये केवळ) पोटगी मंजुर करावी अशी त्यांनी विनंती केली.

**०५.** गैरअर्जदार हा प्रस्तुत प्रकरणात हजर झाला परंतू पुरेसी संधी देवूनही त्याने त्याचा खुलासा सादर केला नाही. त्यामुळे दिनांक २७.०३.२०२४ रोजीच्या निशाणी क्र. ०१ वरील आदेशान्वये प्रस्तुत प्रकरण गैरअर्जदाराच्या विरुध्द विना खुलासा चालविण्यात आले.

## वादप्रश्न व निष्कर्ष

**०६.** अर्जदारांची हकीकत, न्यायालयासमक्ष आलेला साक्षीपुरावा व सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराने अर्जदारांचा सांभाळ करण्याची उपेक्षा केली किंवा नकार दिला आहे काय ? | **.... होय** |
| २. | अर्जदार हे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहेत काय? | **.... होय** |
| ३. | अर्जदारांचा उदरनिर्वाह करण्याईतपत गैरअर्जदाराची पुरेशी ऐपत आहे काय? | **.... होय** |
| ४. | अर्जदार हे निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहेत काय काय? | **अंशतः होय** |
| ५. | काय आदेश? | **अंशतः मंजूर** |

## कारणमीमांसा

०७. अर्जदार हिने तिच्या अर्जातील कथने सिध्द करण्याकरीता स्वतःचा पुरावा नि.क्र.१२ वर दिला आहे. त्यामध्ये तिने अर्जातील कथनांचा पुर्णोचार केला. त्यामध्ये तिने कथन केले की, तिच्या सासरकडील मंडळींनी अर्जदार हिला त्रास दिल्यामुळे तिने दिनांक २७.०२.२०२३ रोजी महिला सहाय्यक कक्ष, नांदेड यांच्याकडे तक्रार दिली होती. तसेच अर्जदार हिने तिच्या सासरच्या लोकांनविरुध्द दिनांक २८.०३.२०२३ रोजी ४९८–अ भारतीय दंड विधान, १८६० (भा.द.वि.) प्रमाणे तक्रार दिली होती त्यावरुन त्यांच्या विरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. अर्जदार क्र.२ हा अपंग असल्यामुळे अर्जदार हिने मोल मजुरी करुन त्याचा औषधोपचार व उदरनिर्वाह केला. गैरअर्जदार यांनी अर्जदारांची कुठल्याही प्रकारची पालनपोषणाची व्यवस्था केली नाही.

०८. अर्जदार हिने तिच्या पुराव्यात पुढे कथन केले की, अर्जदार क्र.२ हा अपंग आहे तसेच अर्जदार क्र.३ ची सुध्दा तिच्यावर जबाबदारी आहे. अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ असल्याबाबतीत गैरअर्जदाराने कोणताही पुरावा किंवा म्हणणे दाखल केले नाही. तसेच गैरअर्जदार यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन असल्यासंदर्भात अर्जदार हिने तिच्या पुराव्यात तोंडी कथन केलेले आहेत. गैरअर्जदार याच्याकडे पिकअप बोलोरो असल्याबाबत कुठलाही दस्त अर्जदार हिने अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच गैरअर्जदारकडे शेती असल्याबाबत सुध्दा कुठलाही दस्त अभिलेखावर अर्जदार हिने दाखल केलेले नाहीत. त्यामुळे शेतीपासून व गाडी पासून उत्पन्नाबाबत अर्जदार हिच्या तोंडी पुराव्याला पृष्ठी देणारा इतर कुठलाही कागदोपत्री ठोस पुरावा न्यायालया समक्ष आलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदार याला शेतीमधून दरवर्षी ८०,०००/– (अक्षरी ऐंशी हजार रुपये केवळ) उत्पन्न मिळते व बोलोरो पिकअप पासून ३,६०,०००/– (अक्षरी तीन लक्ष साठ हजार रुपये केवळ) मिळतात या बाबी सुध्दा सिध्द झाल्या नाहीत.

**०९.** अर्जदार हिने तिच्या पुराव्यात कथन केले की, गैरअर्जदार हा मिस्त्री काम करतो व त्यापासून त्याला ७००/- (अक्षरी सातशे रुपये केवळ) रोजी मिळते. मिस्त्री कामाबाबत सुध्दा अर्जदार हिने कुठलाही दस्त किंवा इतर ठोस पुरावा न्यायालयासमक्ष आणलेला नाही. परंतु, तिचा तोंडी पुरावा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहिला आहे. तसेच दुसऱ्याबाजुने विचार करीता सध्याची परिस्थिती पाहता सक्षम व्यक्ती हा ५००/- (अक्षरी पाचशे रुपये केवळ) रोज सहज कमावू शकतो. या ठिकाणी त्या व्यक्तीला नियमित काम मिळते किंवा नाही या बाबी विचारात घेणे गरजेचे आहे. परंतु, ठोबळ मानाने विचार करीता महिण्यातून २० ते २५ दिवस काम एखाद्या व्यक्तीस सहज मिळू शकते. त्यामुळे दहा ते बारा हजार रुपये तो महिण्याकाठी कमावू शकतो. तसेच दुसऱ्या बाजुने विचार करीता अर्जदार क्र.१ चे पती, अर्जदार क्र. ०२ व ०३ यांचे वडील या नात्याने गैरअर्जदारावरती अर्जदारांच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. तसेच अर्जदार क्र.२ हा अपंग असल्याची बाब सुध्दा विचारात घेता येईल. सबब, एकंदरीतच अर्जदार व गैरअर्जदार यांच्या राहणीमानाचा विचार करीता अर्जदार क्र.१ ही रु.२,०००/- (अक्षरी दोन हजार रुपये केवळ) प्रति महिणा व अर्जदार क्र.०२ व ०३ प्रत्येकी रु.१,०००/-(अक्षरी एक हजार रुपये केवळ) महिण्यास मिळणे न्यायोचित होईल व सदर निर्वाह भत्ता देणे देखील गैरअर्जदारास शक्य होईल. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ उत्तर होकारार्थी व वाद प्रश्न क्रमांक ०४ चे उत्तर अशंतः होकारार्थी देण्यात येत आहे व वादप्रश्न क्रमांक ०५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला.

**२.** गैरअर्जदार यशवंत गणपतराव काळे याने अर्ज दाखल केलेल्या दिनांक १५.०९.२०२३ पासुन अर्जदार क्रमांक ०१ हिस दर महा रु.२,०००/- (दोन हजार मात्र) व अर्जदार क्रमांक ०२ व ०३

यांना प्रत्येकी दरमहा रु.१,०००/- (प्रत्येकी एक हजार मात्र) निर्वाह भत्ता देण्याचे यानुसार निर्देशीत करण्यात येत आहे.

३. गैरअर्जदाराने अर्जदारांना या प्रकरणाच्या खर्चा पोटी रुपये २,०००/- (दोन हजार मात्र) द्यावेत.

४. उभय पक्षकार यांना निकालाची प्रत विनामुल्य देण्यात यावी.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN

Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2026.08.13 17:20:51 +0530

लोहा
दिनांक: १३/०८/ २०२५

(निरंजन बा.चव्हाण)
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**लोहा, जिल्हा नांदेड**

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per the original judgment -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V.N.Devare, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,Loha |
| Date | : | 13/08/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 13/08/2026 |
| Order uploaded on | : | 13/08/2026 |